# बुलडाणा नगरपरिषद कार्यालय

(नियम क्र. ६.१.१ ( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ६९ आणि महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये )

## बांधकाम परवाना मंजुरी (अधिकृत)

बांधकाम परवाना क्रमांक :- BPA\00047\2016-17
दिनांक :- 28/10/2016

प्रति,
श्री संजय विनायक कोलते
बुलडाणा,बुलडाणा , 443001

विषय:- बांधकाम परवाना (प्राथमिक) मंजुरी ( अधिकृत ) मंजुरी देणेबाबत.
संदर्भ:- अर्ज क्र. -- 20616102800001 अर्ज दि. -- 28/10/2016

महोदय / महोदया ,

आपण खालील ठिकाणी अन्वये विकास कार्य करण्यासाठी बांधकाम परवाना मिळण्यासाठी दि : 28/10/2016 रोजी केलेल्या अर्जास अनुसरुन या खालील व पाठीमागे दिलेल्या शर्ती व अटीस पात्र राहून आणि सोबत जोडलेल्या मंजुर बांधकाम नकाशावर लाल रंगाने दर्शविलेल्या सुधारण्यास पात्र राहुन आपणास हे प्रारंभ प्रमाणपत्र नुसार हा बांधकाम परवाना देणेत येत आहे.

प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ: निवासी वापरासाठी (303.28 चौ.मि.)
बांधकाम तपशील : निवासी वापरासाठी तळ मजला(36.86 चौ.मि.), तीसरा मजला(85.39 चौ.मि.), दुसरा मजला(90.63 चौ.मि.) व पहिला मजला(90.63 चौ.मि.).

### बांधकामाच्या जागेचे वर्णन

| | | | |
|---|---|---|---|
| मौजा / सि.स.नं. | :- | त.सा.क्र. / स.नं. (सर्व्हे नं.) | :- 28/2,29/1 |
| गट क्र. / ख.क्र./ भूखंड क्र./ विभाग | :- - | प्लॉट क्र. | :- 22 |
| रस्ता/प्रभाग क्र. | :- | शहर | :- बुलडाणा |
| प्लॉटचे क्षेत्रफळ | :- 303.28 | हिस्सा क्र. | :- |
| बांधकामाचे क्षेत्रफळ | :- 303.51 | नगर | :- |

खास शर्ती / अटीवर

1. भूखंडाचे चारही बाजूने मोकळया सोडावयाचे समासाचे अंतर खालीलप्रमाणे सोडलेले असावे. समोरील बाजूने नियमानुसार कमीतकमी ६-००/४-५०/३-०० मिटर, मागिल बाजूने ४-५०/३-००/१-५० मीटर, राहिलेल्या दोन्ही बाजूने ३-००/२-२५/१-५० मिटर.
2. सोबतचे मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम करावे. बांधकामात कोणताही फेरबदल करू नये.
3. सदर परवनागी तुम्हास तुमचे स्वताचे मालकीचे भूखंडामध्ये बांधकाम करण्याकरिता बंधनकारक आहे . इतर कोणत्याही खाजगी दुसर्याचे मालकीचे भूखंडावर सरकारी तसेच तुमच्या स्वताचे मालकीच्या नसलेल्या भूखंडावर बांधकाम करू नये.
4. आजूबाजूचे खाजगी अथवा सरकारी जमीनीवर अतिक्रमण करू नये.
5. संभाव्य ईमारत बांधकामाचे साहित्य विनापरवानागी सरकारी जमीनीवर, रस्त्यावर सर्विस लाईन मध्ये ठेवू नये.
6. स्वताचे भूखंडातील कोणतेही सांडपाणी, सेप्टिक संडासाचे पाणी, पावसाचे साचणारे पाणी हे स्वखर्चाने पक्यानालीद्वारे पाइपद्वारे, रस्त्या लगतच्या नजीकच्या नगर पालिकेच्या पक्क्या नालीपर्यंत आणून सोडलेले असावे.
7. सदर संभाव्य इमारतीचे प्राप्त परवानगीने बांधकामत जर नगर रचनाकार बुलडाणा ह्यांनी काही फेरबदल सुचविल्यास फेरबादालाप्रमाणे बांधकाम करणे तुम्हास बंधानाकारक राहिल.
8. स्वताचे मालकीचे भूखंडासमोर किमान पाच वृक्ष लावावीत.
9. सदर इमारत बांधकाम पूर्ण झाल्यावर तुमचे आर्कीटेकट / इजीनियर ह्यांचे मार्फत नकाशाच्या दोन प्रती दाखल कराव्यात. त्यातील प्रत कापडावर चिटकवलेली असावी.
10. संभाव्य ईमारत बांधकाम हे प्लिंथचे (पायव) लेव्हला आल्यानंतर बांधकामाची तपासणी करीता नगर पालिकेकडे रीतसर अर्ज देवून पुढील बांधकामाची परवानगी मिळाल्यावर प्लिंथचे (सुपर ) वरचे बांधकाम करावे.
11. इमारतिचे बांधकाम पुर्ण झाल्यावर तिचा वापर (ऑक्युपंसी सर्टीफिकेट) वापर प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय करु नये. त्यासाठी रितसर अर्ज दाखल करावा. तो पावेतो इमारतिचा अथवा इमारतचे कोनतेही भागाचा निवासी उपयोगासाठी, व्यवसायासाठी, गोडाऊन म्हणुन

## बुलडाणा नगरपरिषद कार्यालय

(नियम क्र. ६.१.१ ( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ६९ आणि
महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये )

अथवा इतर कारणासाठी उपयोग करु नये व तशी परवानगी कोणासही देऊ नये.

12. सोबत जोडलेल्या नकाशात व साईट प्लँन मध्ये दर्शविल्याप्रमाणे / लाल शाईने केलेले दुरुस्तीप्रमाणे संभाव्य इमारतीचे बांधकाम करण्यात यावे.
13. इमारतिच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी संकलित करुन पुन:भरण करावे हे पाणी सोकपिट खोदुन विंधन विहिर / विहिर ह्यामध्ये सोडण्यात यावे.
14. प्रस्तावित बांधकाम हे भुकंप रोधक राहिल याची दक्षता घ्यावी.
15. सौर ऊर्जेचा वापर करणे बंधनकारक राहिल.
16. अर्ध्या भुखंडावर बांधकाम संमतीपत्राद्वारे करणर असुन भविष्यात आपसादवाद निर्माण झाल्यास न.प. जबाबदार राहनार नसुन वैयक्तीक संबंधित मालक जबाबदार राहिल. या अटीस अधिन राहुन अर्ध्या भुखंडावर बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.
17. प्रस्तावित बांधकाम परवानगी बाबत कोणताही कायदेशिर प्रश्न निर्माण झाल्यास सदर प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजण्यात येइल.नाहरकत प्रमानापात्राच्या जागेच्या मालकी संबंधी अस्तित्वात असलेल्या अगर चालु असलेल्या वादासंबधी नगर पालिका बुलडाणा ह्यांचा कोणताही संबध राहणार नाही. हे प्रारंभ प्रमाणपत्र (इमारत बांधकामाची परवानगी) तुम्हास मिळाल्याचे तारखेपासून फक्त पुढील एक वर्षाचे कालावधी करीता वैध राहील.
18. भुमि अभिलेख कार्यालयाकडुन अंतिम रेखांकनातिल भुखंड साक्षांकित प्रत साद्रर करण्याच्या अटीवर परवाणगी देण्यात य़ेत आहे.
19. खोटी कागदपत्र आढळल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.

येणेप्रमाणे परवाना दिला असे ,

| | |
|---|---|
| बांधकाम परवाना क्रमांक | :- BPA\00047\2016-17 |
| दिनांक | :- 28/10/2016 |

प्रत माहितीसाठी
कर निर्धारिण अधिकारी

बुलडाणा नगरपरिषद कार्यालय

मुख्याधिकारी
बुलडाणा नगरपरिषद कार्यालय